# जागर शक्तीचा , जागर भक्तीचा, जागर अंबाबाईचा

महाराष्ट्रातील देवीची साडेतीन शक्तिपीठे आहेत .

१) माहूरगडची रेणुका (एकविरा, यमाई)

२) तुळजापूरची भवानी

३) कोल्हापूरची महालक्ष्मी (अंबाबाई)

४) वणीची सप्तशृंगी

ही महाराष्ट्रातील देवीची साडेतीन शक्तिपीठे होत. ही साडेतीन शक्तिपीठे म्हणजे ॐ काराचे सगुण रूप आहे. ॐ कार म्हणजे प्रणव म्हणजेच परमात्म्याचे साकार आणि प्रकट रूप मानले जाते. ॐ कारामध्ये सार्धत्रय (साडेतीन) मात्रा आहेत. त्याप्रमाणेच साडेतीन शक्तिपीठे क्रमशः अशी आहेत :

१) मातापूर  २) तुळजापूर  ३) कोल्हापूर  ४) सप्तशृंगी

'अ'कार पीठ माहूर, 'उ'कार पीठ तुळजापूर, 'म'कार पीठ कोल्हापूर, आणि ऊर्धमात्रा सप्तशृंगी.

# माहूरगडची श्री रेणुका

ऋग्वेदातील उषासुक्तामध्ये उशाला आदितीमुखा म्हटले आहे. हिलाच अनार्वा व दिव्या गौम्भ नावाने संबोधिले जाते. रेणुका हे देवमाता अदितीचे रूप आहे म्हणून या क्षेत्राला मूळपीठ म्हणतात. वेदात रेणुकेचा उल्लेख नाही पण महर्षी जमदग्नी याचा उल्लेख वारंवार आढळतो. जमदग्नी हा प्रत्यक्ष शिवाचा अवतार मंत्रदंष्ट्रा ब्रह्मर्षी होत. ऋग्वेदाचा दशमंडलाचा द्रष्टा तसेच, उश्मांड हवन विधीचा प्रचारक तसेच ससर्परी विद्या आणि श्राद्ध विधीचा रचयिता महर्षी जमदग्नी हे होत. महर्षी जमदग्नीचे आश्रम व **ऋषीकुल** जिथे जिथे होत तिथे तिथे रेणुका मातेचे स्थान आहेत. तरी पण मूळ स्थान म्हणजे सती स्थान माहूर किंवा मातापूर हेच मुख्य आहे. रेणुका हि अग्नी तत्वाशी संबंधित आहे. अग्नी ज्वालावर अधिष्ठित व अग्नी ज्वालावर **परीवेष्ठित** रूपाचे वर्णन सर्वत्र आढळते त्यामुळे रेणुका ही अग्नी देवता आहे. देव माता अदिती ही प्रलायाग्निवर आरूढ व अग्नीवलयांकित आहे. त्या प्रमाणे चीदग्नी अग्नी संभवा रेणुका जमदग्नी बरोबर विवाह बद्ध झाली. सूर्य व अग्नी देव तिच्या पोटी पुत्र रूपाने अवतरले. विवाहाच्या वेळी दोघांनी श्रवताग्नी व चेताग्निचे व्रत ग्रहण केले व शेवट पर्यंत ते व्रत केले. व शेवटी ही अग्नीच्या चिताग्नी मध्ये लुप्त झाली व पुन्हा अग्नी मधून प्रगटली. भक्त कल्याणासाठी शाश्वत रुपात प्रतिष्ठित झाली ते क्षेत्र म्हणजे माहूर. भगवती अदिती रेणुका, मूळशक्ती, अनादी शक्ती व पराक्रमेची महाशक्ती आहे. दशावतारा मध्ये वामन व परशुराम हे दोन अवतार ब्राह्मण कुलसंभूत अवतार आहेत. दोघांची माता अदिती व रेणुका होय. परशुरामाच्या कारणामुळे पुत्र वत्सला पृथ्वीवर सदैव अधिष्ठित रेणुका हीच होय. सर्व देवी देवता अवतार कार्य समाप्ती नंतर निजधामास गेले पण रेणुका देवी अंतर्धान पावल्यावर मातेच्या ममतेने पुन्हा पृथ्वीवर प्रगटली ती कायमचीच.

स्वतः आदीशक्ती स्वरूपिणी, पतीदेव साक्षात शिव आणि पुत्र परशुराम म्हणजे प्रत्यक्ष महाविष्णूचा अवतार, हा त्रिवेणी संगम. आदिशक्ती सती जाताना प्रत्यक्ष महाविष्णू (परशुराम) मंत्राग्नी देत आहेत. सृष्टी संचालक त्रिदेव दत्तात्रेय सती कर्माचे पौरोहित्य करीत आहेत असा अद्भुत प्रसंग विरळाच. सतीच्या शरीराचे श्री विष्णूंनी सुदर्शन चक्राने तुकडे केले ते जिथे जिथे पडले ती सर्व ठिकाणे शक्तिपीठे बनली. माहूरक्षेत्री सतीचे स्तनद्वय पडले. मातृदेहा मध्ये वात्सल्य रसाचे स्थान म्हणजे स्तनद्वय किंवा पयोधर होय. या मातृत्वाच्या वात्सल्याचे मूळ ठिकाण म्हणजे पुरःस्थल म्हणजेच माहूर.

देवीच्या साडेतीन शक्तिपीठांपैकी एक मूळ जागृत पीठ म्हणजे, माहूरची श्री रेणुकामाता होय. श्री परशुरामाची माता म्हणूनही रेणुकामातेला ओळखले जाते. महाराष्ट्रातील अनेक परिवारांची ही कुलदेवता आहे.देवीचे मंदिर

१३ व्या शतकात देवगिरीच्या यादवकालीन राजाने बांधले आहे असे म्हटले जाते. माहूरगडावरच श्री दत्तात्रयांचा जन्म झाला अशी भाविकांची श्रद्धा आहे. आख्यायिका-

एका कथेनुसार, माता पार्वतीने कुब्ज देशाच्या राजाच्या पोटी जन्म घेतला. तिचे नाव रेणू असे ठेवण्यात आले. शंकराचा अवतार मानलेल्या जमदग्नी ऋषीबरोबर तिचे लग्न झाले . जमदग्नीच्या आश्रमात अनेक शिष्य शिकत असत. सर्वांच्या मनोकामना पूर्ण करणारी कामधेनू गाय जमदग्नीकडे होती. राजा सहस्रार्जुनाला या कामधेनूचा मोह झाला. त्याने जमदग्नीकडे कामधेनू मागितली. ऋषीने राजाची मागणी मान्य केली नाही. तेव्हा पराक्रमी जमदग्नीपुत्र परशुराम आश्रमात नाही, हे साधून सहस्रार्जुनाने आश्रमावर हल्ला केला. आश्रम उद्ध्वस्त करून जमदग्नींना ठार मारले व कामधेनू हिरावून नेली. नंतर त्यांचा पुत्र परशुराम तिथे आला. घडला प्रकार बघून परशुरामाने क्षत्रियांचा विध्वंस करण्याची प्रतिज्ञा केली. पित्याला अग्नी देण्यासाठी कोरी भूमी हवी म्हणून त्याने कावडीच्या एका पारड्यात जमदग्नींचे पार्थिव व दुसऱ्या पारड्यात माता रेणुकेला बसवले. रानोमाळ भटकत अखेर तो माहूरगडावर आला. तिथे वास्तव्यास असलेल्या दत्तात्रेयाने त्याला कोरी भूमी दाखवली व 'इथेच पित्यावर अग्निसंस्कार कर' असे सांगितले. परशुरामाने प्रथम बाण मारून मातृतीर्थ व सर्वतीर्थ निर्माण केले. या पाण्याने स्नान घालून जमदग्नीवर अंत्यसंस्कार केले. यावेळी माता रेणुका सती गेली. या सर्व विधींचे पौरोहित्य दत्तात्रेयांनी केले.

त्यानंतर परशुरामाला माता रेणुकेची खूप आठवण येऊ लागली. तो दु:खी होऊन शोक करत होता, तोच आकाशवाणी झाली. 'तुझी आई जमिनीतून वर येऊन तुला दर्शन देईल. फक्त तू मागे पाहू नकोस.' परंतु परशुरामाची उत्सुकता चाळवली गेल्याने त्याने मागे वळून बघितले. त्यावेळी रेणुकामातेचे केवळ मुखच जमिनीतून वर आले होते. तेवढेच परशुरामाला दिसले. या तांदळारूपातल्या मुखाचीच माहूरला पूजा होते. परशुरामाला या डोंगरावर मातेचे दर्शन झाले म्हणून याला 'मातापूर' म्हणू लागले. शेजारच्या आंध्रप्रदेशात 'ऊर' म्हणजे गाव ते 'माऊर' आणि पुढे 'माहूर' झाले.!! तसेच कालांतराने माहूर ला (मा=मायेच,(आई) हूर:- हृदय) "आई चे हृदय" असलेले ठिकाण म्हणजे "माहूर" असे संबोधले जाऊ लागले,



# तुळजापूरची श्री भवानी

तुळजा भवानी शिवरायांची आराध्य दैवता व महाराष्ट्रातील अनेकांची कुलस्वामिनी आहे. पुराणात या देवीची तीन नावे आढळतात 'त्वरिता', 'तुरजा', 'तुळजा'. त्वरित म्हणजे शीघ्र प्रसन्ना होणारी 'त्वरिता' आणि भक्तांच्या हाके सरशी धावणारी 'तुरजा'. 'तूर' म्हणजे त्वरित + जा म्हणजे जाणारी, त्वरित धावणारी ती 'तुरजा'. 'तुरजा' या शब्दाचा अपभ्रंश 'तुळजा' झाला (र-लयोर्भेदः).

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तिपीठांपैकी श्री तुळजाभवानी देवीचे तुळजापूर क्षेत्र हे एक पूर्ण शक्तिपीठ आहे. ही देवी भगवती (भवानी) म्हणून प्रसिद्ध आहे. महाराष्ट्र क्षात्रतेजाची स्फूर्ती देवता, प्रेरणाशक्ती व स्वराज्य संस्थापक राजे श्री शिवछत्रपती यांची आराध्यदेवता, अशी ही तुळजापूरची भवानीदेवी महाराष्ट्राची कुलस्वामीनी आहे. हिंदवी स्वराज्याचे संस्थापक श्री छत्रपती शिवाजी महाराज यांना भवानी तलवार देउन हिंदवी स्वराज्य स्थापनेचा आशीर्वाद दिला.

हे शहर बालाघाटच्या एका कड्यावर वसले आहे. मंदिराच्या काही भागाची धाटणी हेमाडपंती आहे. इतिहास व पुरातत्त्वदृष्ट्या हे मंदिर राष्ट्रकुट अथवा यादवकालीन मानले जाते. तुळजाभवानी संबंधित सर्वांत जुना शिलालेख तुळजापूर तालुक्यातील ‘काटी’ येथे इ.स. १३९७ सालच्या शिलालेखात पहावयास मिळतो.

श्री तुळजाभवानी मंदिरात प्रवेश करण्यासाठी दोन मोठी प्रवेशद्वारे आहेत. एका प्रवेशद्वारास राजे शहाजी महाद्वार तर दुसऱ्या दरवाजाला राजामाता जिजाऊ महाद्वार असे नाव देण्यात आले आहे. देवीच्या मंदिरात जाण्यासाठी दगडी पायऱ्या आहेत.पायऱ्या उतरून खाली गेल्यानंतर गोमुख तीर्थ येथे दर्शनाला जाण्यापूर्वी भाविक येथे स्नान करतात तसेच हातपायही धुतात. समोरच कल्लोळ तीर्थ आहे. देवीच्या स्नानासाठी तीन तीर्थ एकत्र आली असे कल्लोळ तीर्थाच्या बाबतीत सांगितले जाते. मंदिराच्या मुख्य द्वारापाशी उजव्या सोंडेचा सिद्धीविनायक आहे. येथेच आदीशक्ती आदिमाया व अन्नपूर्णा देवीचे मंदिरही लक्षवेधून घेतात. पुढे गेल्यावर मंदिराचे आवार दर्शनी पडते. या प्रशस्त आवारात भाविकांना बसण्याची सोय करण्यात आली आहे. येथूनच श्री तुळजाभवानी देवी मंदिराचे दर्शन होते. मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याचा दरवाजा चांदीच्या पत्र्याने मढविला असून, त्यावर सुरेख असे नक्षीकाम करण्यात आले आहे. येथेच श्री तुळजाभवानीची प्रसन्न आणि तेजस्वी काळा पाषाणाची मूर्ती दिसून येते. तीन फुट उंचीची ही मूर्ती स्वयंभू आहे. अष्टभुजा महिषासूरमर्दिनी सिंहासनावर उभी असून मस्तकाच्या मुकुटातून केसांच्या बटा बाहेर आलेल्या आहेत. आईया आठ हातात त्रिशूळ, बिचवा, बाण, चक्र, शंख, धनुष्य, पानपात्र आणि राक्षसाची शेंडी आहे. पाठीवर बाणाचा भाता असून देवीच्या मुख्याच्या उजव्या व डाव्या अंगाला चंद्र व सूर्य आहेत. तुळजाभवानीचा उजवा पाय महिषासून राक्षसावर तर डावा पाय जमिनीवर दिसून येतो. दोन पायांच्यामध्ये महिषासूर राक्षसाचे मस्तक आहे.

श्री तुळजाभवानी देवीची मुर्ती चल मुर्ती आहे. येथे उत्सव मूर्तीची मिरवणूक न काढता प्रत्यक्ष श्री तुळजाभवानी देवीच्या मुर्तीची पालखीत बसवून मंदिराभोवती मिरवणूक काढली जाते. वर्षातून एकूण तीन वेळा मुर्ती सिंहासनावरून हलवून गाभाऱ्याबाहेर असलेल्या पलंगावर ठेवली जाते. नंतर विजयादशमीच्या दिवशी सिमोल्लंघनाच्या वेळी आईची पालखीतून मिरवणूक काढली जाते. देवीच्या पालखीसोबत श्रीयंत्र, खंडोबा आणि महादेवाची मिरवणूकही निघते.

तुळजाभवानी मातेच्या मंदिर मधील रंगपंचमी - श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिर मधील रंगपंचमी, श्री देवीच्या मंदिर मध्ये पारंपारिक पद्धतीने रंगपंचमी हा उत्सव साजरा होतो.

काळभैरव भेंडोळी उत्सव - काळभैरव भेंडोळी उत्सव हा दरवर्षी दिवाळीच्या नरकचतुर्दशी या वेळी स्थितीनुसार असतो, हा उत्सव पाहण्यासाठी हजोरो भाविक श्री तुळजाभवानी मंदिर मध्ये येतात.

**दसरा उत्सव - श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिर मधील एक अदभूत असा दसरा उत्सव आहे. श्री तुळजाभवानी मातेची मुर्ती हि मंदिर परिसर मधील पिंपळाच्या पारावर आणून पालखी मध्ये ठेऊन मंदिर प्रदक्षणा करण्यात येते. भाविक हळदी कुंकू यांची उधळण श्री देवीच्या पालखीवर करतात या उत्सवा मध्ये लाखो भाविक सहभागी होतात.**

**ग्रहण कालावधी - श्री तुळजाभवानी मातेच्या मंदिर मध्ये ग्रहण काळात श्री देवीस सोवळ्यात आणि पांढर्याशुभ्र वस्त्रा मध्ये ठेवण्यात येते आणि साज शृंगार नसतो आणि ग्रहण कालवधी संपल्यावर श्री देवीस स्नान घातले जाते आणि पूजा करण्यात येते.**

**नवरात्रीच्या काळात भक्त राज्यभरातून ठिकठिकाणांहून पायी पालख्या घेऊन येतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी भवानी चरणी अर्पण केलेली सोन्याच्या पुतळ्याची माळ आजही देवीच्या मुख्य अलंकारांपैकी एक आहे. श्री तुळजाभवानी ही आदिशक्ती म्हणून सर्वश्रेष्ठ मानली गेली आहे.**

**शारदीय नवरात्र उत्सव - श्री तुळजाभवानी मातेचा नवरात्र उत्सव हा मोठ्या प्रमाणात साजरा केला जातो या नवरात्र काळात नऊदिवस पुजा, घटस्थापना करण्यात येते, श्री देवीस विविध प्रकारच्या अलंकार पुजा करण्यात येतात असे अनेक कार्यक्रम साजरे होतात. या उत्सवाला लाखोच्या संख्येने भाविक-भक्त तुळजापूरला येतात.**



# कोल्हापूरची श्री महालक्ष्मी (अंबाबाई)

कोल्हापूरला आद्य मातृशक्तीचे मुख्य स्थान म्हणतात. या क्षेत्राला 'महामातृका पीठ' व 'दक्षिण काशी' म्हणून ओळखले जाते. श्री महालक्ष्मीच्या मंदिरातील रचना चक्रराज (श्री यंत्र) प्रमाणे सर्वतो भद्र मंडल प्रमाणे आहे. या मंदिरात पाच शिखरे व तीन मंडपे आहेत. गर्भ गृह मंडप, मध्य मंडप व गरुड मंडप हे तीन मंडप होत. प्रमुख व विशाल मंडपा मध्ये १६ x १२८ स्तंभ कलाकुसरींनी युक्त आहेत. माहूरला मातापूर असे म्हणतात. याच क्षेत्री भगवान दत्तात्रेय नित्य भिक्षाग्रहण (भोजन) करतात. या कुंडातून, सती कुंडातून परशुरामाच्या पुत्र प्रेमापोटी, वात्सल्यापोटी देवी रेणुका प्रकट झाली. इथे केवळ देवीचा चेहराच आहे पूर्ण मूर्ती नाही, केवळ शिरोभागच आहे.

कोल्हापुरातील महालक्ष्मी म्हणजे अंबाबाई, हिचा उल्लेख पुराणात देखील सापडतो. ही साडेतीन शक्तिपीठा पैकी एक आहे. इथे बरीच प्राचीन मंदिरे आहेत. कोकणाचा राजा कर्णदेव कोल्हापुरात आल्यावर ही मूर्ती एका लहानश्या मंदिरात होती. त्याने इथल्या मंदिराच्या बाजूस स्वच्छता करवून मंदिराला प्रकाशात आणले. वास्तुशास्त्राच्या बांधणीनुसार चालुक्य राजवटीत मंदिराचे बांधकाम केले गेले. हे मंदिर हेमाडपंथी शैलीत बांधण्यात आले असून या मंदिराला चक्क पाच कळस आहेत. जुन्या मंदिरातील खांबाला ‘गरूड खांब’ म्हणतात.

पुराणानुसार आदिशक्तीची एकशे आठ ठिकाणे आहेत. त्यांच्यापैकीच करवीर क्षेत्रास विशेष महत्त्व आहे. येथे इच्छापूर्तीसोबतच मनःशांतीही मिळते. त्यामुळेच उत्तर काशीपेक्षाही ह्या ठिकाणास माहात्म्य आहे, असा भाविकांचा विश्वास आहे. श्री महालक्ष्मी व भगवान विष्णूंचे वास्तव्य करवीर भागात असल्याची श्रद्धा आहे. हे श्री महालक्ष्मीची मूर्ती रत्नजडित खड्यांपासून घडविण्यात आली असून ती जवळपास पाच ते सहा हजार वर्षापूर्वीची असावी, असे बोलले जाते. या मंदिराच्या कोरीव कामामध्ये वेगवेगळे वेद मंत्र कोरले आहेत. या देवीची मूर्ती किमतीच्या दगडाची असून वजनाला ४० किलोग्रॅमची आहे. मूर्ती घडताना हीरक नावाचा धातू मिसळला आहे. हे मंदिर चौकोनी दगडांच्या तुकड्यावर उभारले गेले आहे. या मूर्तीला चार हात असून एका हातात तलवार आणि दुसऱ्या हातात ढाल आहे. उजव्या हातात खालील बाजूस महाळुंग आहे आणि डाव्या हातात पानाचे ताट आहे. डोक्यावर मुकुट असून त्यावर शेषनागाची मूर्ती आहे.

१७व्या शतकात या लहान मूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली. या मंदिराचे तोंड पूर्वीकडे किंवा उत्तरेकडे असतं. देवीची मूर्ती पश्चिममुखी आहे. मंदिराच्या पश्चिमीकडील भिंतीवर छोटीशी खिडकी आहे. या मंदिरात साखर मिश्रित दुधाचा नैवेद्य करून १० वाजता शेष आरती केली जाते. रात्री देवीच्या गाभाऱ्यात आरती केली जाते. त्या नंतर मुख्य दार आणि इतर दार बंद करतात. एकूण दिवसातून ५ वेळा आरती करतात. दररोज पहाटे ४:३० वाजता काकड आरती केली जाते. यावेळी भूप रागातील धार्मिक गीतगायन होते. मंगला आरतीनंतर सकाळी आठच्या सुमारास महापूजा करण्यात येते. रोज रात्री दहाच्या सुमारास शेजारती होते. यावेळी गोड दुधाचा प्रसाद असतो. गाभाऱ्यात आरती करण्यात येते व यावेळी देवीला निद्रा यावी म्हणून विशेष आराधना केली जाते. महाकाली, श्री यंत्र, महागणपती व महासरस्वतीही आरती व नैवेद्य दाखविण्यात येतो. मंदिर परिसरातील सर्व ८७ मंदिरांना आरती ओवाळण्यात येते.

जर एकांदिवस महापूजा झालेली नसल्यास दुधाने अंघोळ घातली जाते. प्रत्येक शुक्रवारी देवीला विशेष नैवेद्य दाखवला जातो. काही सणासुदीला या मंदिराला वेगवेगळ्या पद्धतीने प्रकाशमय केले जाते. दिवाळीच्या कार्तिक महिन्यापासून ते पौर्णिमेपर्यंत वेगवेगळे उत्सव साजरे केले जातात.

दरवर्षी, वर्षातून दोनदा साजरा होणारा ‘किरणोत्सव’ हा सोहोळा ह्या मंदिराचे वैशिष्ट्य आहे. दरवर्षी मार्च आणि नोव्हेंबरमध्ये हा सोहोळा साजरा केला जातो. ठराविक दिवशी उगवित्या सूर्याची किरणे महालक्ष्मीच्या

पायांशी पडतात. हा सोहोळा पाहण्यासाठी, अनुभविण्यासाठी हजारो भाविक आवर्जून कोल्हापुरामध्ये येत असतात. या शिवाय रथोत्सव, अष्टमी जागर, ग्रहण, गोकुळाष्टमीला विशेष आरती केली जाते.



## वणीची श्री सप्तश्रृंगी

सप्तशृंगी हा भारताच्या महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. तो नाशिक जवळील नांदुरी गावाजवळ वसलेला असून अनेक कुटुंबांची कुलदैवत असलेल्या सप्तशृंगी देवीचे तीर्थक्षेत्र आहे. हे महाराष्ट्रातील देवीच्या महाराष्ट्रात असलेल्या ब्रह्मदेवाच्या कमंडलूपासून निघालेल्या गिरिजा महानदीचे रूप म्हणजे सप्तशृंगीदेवी असे मानले जाते. आदिशक्तीचे हे मूळ स्थान आहे असे मानले जाते. देवीचे अठराभुजा सप्तशृंग रूप येथे पहावयास मिळते. ही देवीची मूर्ती स्वयंभू आहे. येथील गाभाऱ्याला शक्तिद्वार, सूर्यद्वार आणि चंद्रद्वार असे तीन दरवाजे आहेत. या तिन्ही दरवाजातून देवीचे दर्शन घडते.

कोणत्याही पुरुषाकडून मरण मिळणार नाही असा वर प्रत्यक्ष शंकराकडून मिळाल्यामुळे महिषासुर नावाचा राक्षस माजला होता. त्याने सरळ स्वर्गावर आक्रमण करून करून इंद्राला तिथून हुसकून लावले होते. त्यामुळे तो ब्रह्मा, विष्णू व महेश या त्रयींकडे मदतीची याचना करू लागला. त्या तिघांनी आपले सामर्थ्य एकवटून एका तेजाची निर्मिती केली. ते तेज अंबेच्या रूपाने पृथ्वीवर अवतरले. या काळात महिषासुर सप्तशृंगीच्या जवळ होता. देवीने त्याचा तेथेच वध केला आणि जगाला त्याच्या जाचातून मुक्त केले अशी कथा आहे. सप्तशृंग येथे वास्तव्य करणारी करणारी देवी म्हणजेच सप्तशृंगी असे मानले आहे. दंडकारण्यात राम-सीता वनवासात असताना देवीच्या दर्शनाला आल्याचे पौराणिक ग्रंथात उल्लेख सापडते. पौराणिक कथांनुसार महिषासुराचा वध केल्यानंतर देवीने विश्रांतीसाठी येथे वास्तव्य केले. महानुभावी लीळाचरित्रात असा उल्लेख

आढळतो की राम-रावण युद्धात इंद्रजिताच्या शस्त्राने लक्ष्मण मूर्च्छा येऊन पडला. त्या वेळी हनुमंताने द्रोणागिरी पर्वत नेला आणि द्रोणागिरीचा काही भाग खाली पडला तोच हा सप्तशृंग गड होय. नाथ संप्रदाय मध्ये नवनाथ भक्तीसार या पोथीत दुसऱ्या अध्यायात वर्णन असे आहे कि दत्तगुरू व महादेव अरण्यात गमन करत असतात व अचानक पणे महादेव यांना कळत की कोणी तरी तपश्चर्या करत आहे ते बघण्या करिता ते दत्तगुरु **यांना पाठवतात** व दत्तगुरु त्यांना घेऊन महादेव कडे येतात आणि महादेव व दत्तगुरु म्हणतात की तुझी इच्छा आदिशक्ती सप्तश्रृंगी देवी पूर्ण करेल. "शाबरी विद्या" ची खरी सुरुवात सप्तश्रृंगी गडावरून होते. सविस्तर माहिती नवनाथ भक्तीसार या पोथीत दुसऱ्या अध्यायात वर्णन केलेली आहे. निवृत्तिनाथांनी समाधी घेण्यापूर्वी काही दिवस उपासना केली होती. शिवाय सुरतेची लूट केल्यानंतर शिवाजी महाराज देवीच्या दर्शनाला आल्याचा संदर्भ बखरींमध्ये नोंदवलेला आढळतो. देवी भागवतातही देवीची देशात १०८ शक्तिपीठे असल्याचा उल्लेख आहे. गडावर चैत्रोत्सव सुरू झाला की खानदेशातील लाखो भाविक अनवाणी चालत येतात. सप्तश्रृंग निवासिनी देवीच्या मूळ ठिकाणाचे दर्शन सर्वांना होत नाही म्हणून अर्धपीठ. सात शिखरांच्या समुदायास सप्तश्रृंग म्हणून ओळखले जाते. यातील एका **अत्युच्च** शिखरावार देवीचे मूळ स्थान आहे. पण ते ठिकाण अतिशय दुर्गम असल्यामुळे वर्षातून एकदा चैत्रपौर्णिमेला ध्वज लावण्यासाठी एकच व्यक्ती मूळ स्थानाला जाते. पुराणातील **वर्णनाप्रमाणे** ह्याच शिखरावर मार्कंडेय ऋषींनी घोर तप केले होते. त्यांच्यावर कृपा करण्यासाठी देवी इथेच प्रकट झाली होती. ते मूळ स्थान अत्युच्च शिखरावरतीच आहे. ह्या ॐकार पर्वतावर चढून जाणे आजही कठीण आहे.

मांडूक्य उपनिषदानुसार साडेतीन मात्रा ॐकार स्वरूपी प्रतिक रूप या शक्तीपीठावरती साधना करणार्यांना भक्ती व मुक्ती दोन्ही बरोबरच मिळतात. माहुरची रेणुका महाकाळी पीठ आहे. सप्तशतीच्या प्राधानिक रहस्यात वर्णन केलेल्या महाकालीच्या दहा नावात एकवीरेचे नाव आहे. एकविरा म्हणजेच रेणुका किंवा यमाई होय. कोल्हापूर महालक्ष्मीचे शक्तीपीठ आहे. तुळजा भवानी महासरस्वतीचे रूप आहे. सात मातृका अर्ध मात्रा स्वरूपी व अर्ध पीठ सप्तशृंगी आहे.



# अमरावतीची श्री अंबादेवी, श्री एकविरा

'श्रीकृष्णाचे रुक्मीणीहरण' या ऐतिहासिक व पौराणिक प्रसंगाला ज्या मंदिरांचा अथवा परिसराचा संदर्भ दिला जातो, ती जागा अमरावतीचे अंबा व एकविरादेवीचे मंदिर असल्याच्या कथा आहेत. आजची ही प्रदक्षिणा याच मंदिरांची. इतिहासकार वा संशोधक या संदर्भाचे शोध वा बारकाव्याचे तपशील काळाच्या कसोटीवर अभ्यासत आहेत. पण विदर्भाचे ऐतिहासिक वैभव म्हणूनच या मंदिरांची ओळख आहे. महाराष्ट्रातील अनेक लेखक, कवी इतिहासकार, कलावंत आणि क्रीडापटूंसह अनेक राजकीय धुरिणांची कारकिर्द या मंदिराच्या प्रदक्षिणेने सुरू होते.

'विदर्भाची सांस्कृतिक राजधानी' असा ज्या शहराचा उल्लेख होतो, त्या अमरावतीमध्ये एकविरा व अंबादेवी या नावाने देवींची दोन मंदिरे आहेत. साधारणत: ही मंदिरे तीन-साडेतीनशे वर्षांपूर्वीच जगाच्या पाठीवर पोहेचली आहे. आता असलेली ही मंदिरे नव्या बांधणीची असली तरी साधारणत: वीसेक वर्षपूर्वी या मंदिराचा चेहरामोहरा पुरातन वाटावा असाच होता. अंबादेवी मंदिराची पुरातन वास्तू लाकडी खांबावर चितारली होती. अजूनही काही भाग याचपद्धतीचा आहे. मंदिरातील प्रवेश मोठमोठ्या काळ्या पायऱ्यांवरुन होतो. सभामंडपात शिरण्यापूर्वी मोठा पितळी दरवाजा आहे. तो पार करून आत प्रवेश केल्यावर थेट देवीचे दर्शन घडते. मात्र तत्पूर्वी मंदिर परिसर लक्ष वेधून घेतो. सभामंडपाचे दोन्ही भाग लाकडी बांधणीचे आहे. प्रदक्षिणामार्ग काळ्या चकत्या दगडांचा होता. आता तो फरशींचा बनला. आता मात्र या मंदिरात प्रवेश घेतल्याक्षणापासून नव्या बदलाची जाणीव होते. अंबादेवी मंदिराच्या मूळ गाभाऱ्याबाहेरील भाग नक्षीदार काचांनी सुभोषित केला आहे. कैकदा वाटू लागते की आपले प्रतिबिंब या काचांमध्ये पडले आहे. तिथे असणारी अंबादेवीची मूर्ती काळ्या पाषाणाची आहे.

मूर्तीच्या स्थापनेचा ऐतिहासिक उल्लेख असणारे दस्तावेज नाही. 'तांदळास्वरुपाची ध्यानस्थ मूर्ती' असे या मूर्तीचे वैशिष्ट्य. या मूर्तीला अमावस्या व पौर्णिमा तसेच मंगळवारी सुवर्णालंकार चढविले जातात. दहा तोळ्यांचा सोन्याचा मुलामा चढविलेला मुखवटा मूर्तीला लावला जातो. बिंदीपासून कंबरपट्ट्यापर्यंत अगणीत दागिन्यांनी ही मूर्ती जेव्हा सजते तेव्हा डोळे दिपतात. वेशभूषेचे खास नियमही आहेत, ते म्हणजे मूर्तीला फक्त नऊवारी साडी परिधान केली जाते. मूर्तीच्या आजूबाजूला शंकर, गणपती, कालभैरव, नंदी आदीच्या मूर्ती आहेत. उंदीर आणि कासवही देखणा आहे. मंदिराला परकोटीची बांधणी आहे. त्याला दोन मोठी दारं आणि ती बंद करण्यासाठी अवजड किल्लेदारी पद्धतीची तटबंदी आहे.

अंबादेवी मंदिराच्या बाजुला एकविरा देवीचे मंदिर आहे. आहुत्यांनी माखलेल्या होमकुंडातून येणारा धुपचंदनाचा मिश्रगंध, फुलांच्या दरवळणारा सुगंध मन वेधून घेतो. नवरात्रौत्सवातील हे चित्र कायम स्मरणात राहते पण नेहमीच अनुभवाला येईल, असे नाही. या मंदिराचे सध्या नुतनीकरण सुरू आहे.

एकविरादेवी मंदिराचा जीर्णोद्धार योगाचार्य श्री जनार्दनस्वामींनी केला होता. त्याला आता चारशे वर्षे होऊन गेली. या मंदिराचे मूळ स्वरुप दुमजली लाकडी बांधणीचे होते तर देवीचा गाभारा काळ्या दगडांचा होता. घुमटावर चारही वेदांची नावे कोरली होती. ती दुरुनच दिसायची. आता सुरू असलेले बांधकाम राजस्थानी गुलाबी दगडांचे कोरीव आहे. मंदिराचा विस्तारही करण्यात आला आहे. जनार्दनस्वामी समाधीभाग खोलगट भागात असल्याने मंदिराचे पुरातन वैशिष्ट्य जपले त्याचबरोबर विस्तार झाल्याने मंदिर हवेशीर आणि प्रशस्त झाले आहे. **सध्या** या मंदिराला तीन बाजुंनी बाहेर जाण्याचे मार्ग आहेत. त्यामुळे गर्दीचे व्यवस्थापन उत्तम पद्धतीने करणे या ठिकाणी शक्य होते.

अमरावती येथील अंबादेवीच्या मंदिराचे अस्तित्व हजार वर्षापासून असल्याची अधिकृत नोंद आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी त्यांच्या राज्यभिषेकाची निमंत्रण पत्रिका अंबादेवीला पाठवल्याचे इतिहासात नमूद आहे.

जुन्या वस्तीच्या परकोटाला लागून हे मंदिर आहे. अंबादेवीची मूर्ती ही पूर्वाभिमुख असून, अतिशय पुरातन आहे. रूक्मिणीहरणाशी या मंदिराचा संबंध जोडला जातो.

**मोगलांनी केले मंदिर उद्ध्वस्त -**

१५०० च्या कालखंडात व-हाडावर मोगलांनी कब्जा केला होता. तेव्हा अनेक नगरांची त्यांनी लुटालूट केली. नुकसान केली. हिंदूंची अनेक मंदिरेही त्यांनी उद्ध्वस्त केली. त्यामध्येच अमरावतीच्या अंबादेवी मंदिराचा समावेश होता. हे मंदिर उद्ध्वस्त झाले होते, मात्र, आतील गाभारा व अंबेची मूर्ती त्यातून सुखरूप राहिली, असे सांगितले जाते. त्यानंतर पुढे १६६० च्या सुमारास श्री जनार्दन स्वामींनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. पुढे नागरिकांनी जनार्दन स्वामींच्या कार्याला हातभार लावला व मंदिराचा कायापालट होत गेला. अहिल्याबाई होळकर यांचेही श्री अंबादेवी मंदिराच्या उभारणीत मोलाचे योगदान आहे.

**पूर्णाकृती आसनस्थ मूर्ती -**

अंबादेवीची स्वयंभू मूर्ती काळ्या रंगाच्या वाळुका पाषाणाची आहे. ही मूर्ती पूर्णाकृती, आसनस्थ आहे.
मंदिराच्या बांधकामात दक्षिण शिल्पकलेचा प्रभाव आहे. मंदिराच्या उत्तर बाजूला मारुती व दुर्गादेवीचे मंदिर आहे. दर मंगळवारी अंबादेवीच्या मूर्तीवर सोन्याचे दागिने चढवले जातात. मुखवटासुद्धा सुवर्णाने मढवलेला असतो. या दागिन्यांमध्ये सोन्याची नथ, बिंदी, बाजूबंद, गळ्यातील एकदाणी, कमरपट्टा, बांगड्या असा साज चढतो.





# कार्ल्याची श्री एकवीरा

एकवीरा आई ही एक हिंदू देवता आहे. भारत आणि नेपाळ या देशांच्या निरनिराळ्या भागांमध्ये अमर ऋषी परशुरामांची आई म्हणून एकवीरा देवीची रेणुका या नावाने देखील उपासना केली जाते.

एकवीरा आई मंदिर हे महाराष्ट्रातील लोणावळा या गावाजवळ कार्ला लेण्यांजवळ आहे. प्रामुख्याने आगरी-कोळी समाजाचे लोक येथे देवीच्या पूजेसाठी येतात. पण कोळी समाजाच्या लोकांबरोबरच एकवीरा देवीची उपासना बऱ्याच इतर समाजांतील लोकांकडून विशेषतः सीकेपी आणि दैवज्ञ ब्राह्मण यांच्याकडूनही केली जाते. तसेच काही कुणबी समाजाच्या शाखेतील लोकांचेही हे कुलदैवत आहे. या मंदिर-संकुलामध्ये एकसारख्या बांधणीची आणि एका ओळीत बांधली गेलेली मूळची तीन मंदिरे असून ती सर्व पश्चिमाभिमुख होती. यापैकी मधले आणि दक्षिणेचे मंदिर पूर्णतः सुस्थितीत असून इतर बांधकामे केवळ नकाशावरच नाममात्र अस्तित्वात आहेत, असे या मंदिराच्या वास्तूचा आढावा घेताना लक्षात येते. या तिन्ही देवळांच्या समोरच महामंडप, वर्षामंडप आणि गोपुर आहेत आणि ही तिन्ही मंदिरे मुख्य देवतेच्या परिवारातील सोळा सदस्य देवतांच्या मंदिरांनी वेढलेली आहेत. अश्विन नवरात्र किंवा शारदीय नवरात्र आणि चैत्र नवरात्रात अनेक भाविक या मंदिरात पूजा आणि उत्सव साजरा करण्यासाठी गर्दी करतात. या मंदिरामध्ये पशुबळी देखील देण्याचा रिवाज आहे. बकरी/ कोंबडी यांसह इतरही काही प्राण्यांचे बळी इथे दिले जातात. या देवीकडे चमत्कारी शक्ती आहेत, अशी भाविकांची मान्यता आहे.

पौराणिक कथेनुसार हे मंदिर पांडवांनी त्यांच्या वनवासाच्या काळामध्ये बांधले होते. एकदा पांडव या पवित्र ठिकाणी आले असताना त्यांच्यासमोर प्रत्यक्ष एकवीरा माता प्रकट झाली आणि तिने त्यांना इथे तिचे मंदिर बांधण्याचा आदेश दिला. पण तिने त्यांची परीक्षा पाहण्यासाठी एक अटही घातली की, पांडवांनी हे मंदिर एका रात्रीत बांधावे. पांडवांनीही हे मंदिर एका रात्री बांधून दाखविले. त्यामुळे त्यांची ही भक्ती पाहून देवी प्रसन्न झाली आणि वनवासानंतरच्या त्यांच्या एका वर्षाच्या अज्ञातवासात त्यांना कोणीही ओळखू शकणार नाही, असा वरही तिने पांडवांना दिला. एकवीरा देवी हा रेणुका मातेचा अवतार आहे.

तथापि, कार्बन डेटिंगनुसार असे आढळते की, या मंदिराची बांधणी दोन कालखंडांमध्ये झाली आहे - इ.स.पूर्व दुसऱ्या शतकापासून ते दुसऱ्या शतकापर्यंत आणि ५व्या शतकापासून ते १०व्या शतकापर्यंत.

सदर मंदिर डोंगरावर आहे. मंदिरात जाण्यासाठी बऱ्याच पायऱ्या चढाव्या लागतात. एकवीरा देवीचे हे मंदिर आजूबाजूच्या पुरातत्व विभागाद्वारे संरक्षित असलेल्या कार्ला लेण्यांनी वेढलेले आहे. मुख्य देवता एकवीरा माता तर तिच्या डावीकडे जोगेश्वरी देवी आहेत. टेकडीच्या अर्ध्या भागामध्ये देवीच्या पवित्र पायांसाठी एक मंदिर आहे.



# मांढरदेवची श्री काळूबाई

महाराष्ट्रातील सातारा जिल्ह्यात वाई तालुक्यातील मांढरदेव येथील श्रीकाळेश्वरी उर्फ काळूबाईची वार्षिक यात्रा पौष महिन्याच्या पौर्णिमेला असते, तिलाच शाकंभरी पौर्णिमा किंवा चुडी पौर्णिमा असेही म्हणतात. श्री काळेश्वरी देवी आदिमाया पार्वतीचेच रूप आहे. ही देवी नवसाला पावणारी असल्याने नवस चुकते करणारे भाविक-भक्त वर्षभर येत असतात. समुद्रसपाटीपासून ५००० फूट उंचीवर असलेल्या गर्द करवंदीच्या वनराईत विराजमान झालेल्या काळूबाईचे स्थान भौगोलिकदृष्टया शंभू-महादेवाच्या डोंगररांगेत पुणे व सातारा या दोन जिल्ह्यांच्या तसेच वाई - भोर- खंडाळा या तीन तालुक्यांच्या सरहद्दीवर शिखरावर वसले आहे. वाई शहराच्या उत्तरेकडे मांदार नावाचा पर्वत आहे तोच हा मांढरगड. अवघ्या २० किमी अंतरावर असलेल्या मांढरदेव येथे जाण्यासाठी साता-याहून वाईमार्गे तर पुण्याहून भोरमार्गे जाता येते. शिवाय पुर्वेकडून शिरवळवरुन लोहोम-झगलवाडी मार्गाने पायथ्यापासून पाऊलवाट आहे. पायथ्याला झगलवाडीतही देवीचे छोटेखानी मंदिर आहे. तेथून डोंगर चढण्यास प्रारंभ होतो. मधल्या टप्प्यावर जाळीतल्या म्हसोबाचे कडक देवस्थान आहे. त्याच्या डाव्या बाजूला एक थंड पाण्याचा झरा आहे. त्यानंतरच्या टप्प्यावर मांढव्य ऋषींची पत्नी मंडाबाईचे दगडी मंदिर आहे. स्थानिक लोक तिला मंडीआई असे म्हणतात. या मंदिरासमोरच गोमुखतीर्थ हे जलकुंड आहे.

द्वापार युगाच्या अखेरीस दैत्यराजा रत्नासूराचा सेनापती देवीलाख्यासूराच्या त्रासापासून ऋषीमुनींची सुटका व्हावी म्हणून मंडाबाईनेच आदिमाया पार्वती देवीला हाक मारली होती. म्हणूनच देवी तिच्या हाकेला धावून आली. या युद्धात काळभैरवनाथाने देवीला साहाय्य केले. पौष पौर्णिमेच्या मध्यरात्री दैत्याला ठार केले. मांढव्यऋषींच्या नावावरून देवीचे नाव मांढरदेवी व गावाचे नाव मांढरदेव असे पडले. त्यांनी हिरडाच्या झाडाजवळ आश्रम बांधून शंभू- महादेवाची तपसाधना केली, त्याठिकाणी मंडेश्वर महादेवाचे मंदिर आहे. त्यालाच मांढेश्वर असेही म्हणतात. हे ठिकाण मंडाबाईच्या मंदिराच्या उजवीकडे थोड्या अंतरावर आहे. शेवटच्या टप्प्यावर भव्य दोन महाद्वारे आहेत तेथुन जवळपास १२५ पाय-या चढाव्या लागतात. मध्यावर उजव्या बाजूस रामभक्त हनुमानाची ५ फूट उंचीची मूर्ती लागते. मुख्य मंदिराचे सभामंडपात देवीच्या पराक्रमाचे प्रतीक असलेल्या सिंहाचे दर्शन घडते. गर्भगृह तीन खणांचे असून मधल्या खणात काळूबाईची दोन फूट उंचीची शेंदूरचर्चित महिषासूरमर्दिनी रुपातील चतुर्भुज अशी बैठी मूर्ती आहे. एका हातात त्रिशूळ, दुसऱ्या हातात ढाल, तिसऱ्या हातात तलवार ही शस्त्रे आहेत. चौथ्या हाताने राक्षसाची शेंडी धरली आहे. मुर्तीच्या समोर महादेवाची पिंड आहे. मूळ मूर्तीवर सोन्याचा किंवा चांदीचा मुखवटा बसवून हिरवी साडी-चोळी नेसवलेली असते. हळदी-कुंकाने आईचा मळवट भरलेला असतो. भक्त आईची ओटी खण-नारळाने भरतात. देवीभक्तीची ज्योत अखंड रहावी म्हणूनच मंदिरासमोरच दोन मोठ्या दीपमाळा आहेत. त्यांच्या उजवीकडे सेवक गोंजीबाबा (गोविंदबुवा) तरडावीकडे शिपाई मांगीरबाबा यांची मंदिरे आहेत. याशिवाय गडावर मरीमाता, लक्ष्मीआई, गंगाजीबाबा, तेलीबाबा तसेच धावजी पाटील यांची स्थाने आहेत. पश्चिमेला गडाच्या रक्षणासाठी लमाणांचा तांडा असून गडाला ५२ वीरांचा वेढा आहे.

पौषी यात्रेच्या दोन दिवस अगोदर जागर, छबिना व मुख्य दिवशी महाअभिषेक, पूजा केली जात असते. या यात्रेत सासनकाठीचा व पालखीचा मान परंपरेप्रमाणे पायी वारी करणारे पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील मौजे 'बोपगावच्या फडतरे' यांना असतो. गावोगावची भक्तमंडळी आईचा देव्हारा डोक्यावर घेऊन ढोल-ताशा-हलगी-संबळ-झांजेच्या तालावर छबीना काढून डोंगर चढून येत असतात. यात्रेला महाराष्ट्रसह देशभरातून लाखो भाविक हजेरी लावून नवस फेडत असतात. शाकंभरी पौणिर्मेशिवाय नवरात्रौत्सवातही काळूबाईला मोठी यात्रा भरत असते. 'काळूबाईच्या नावानं चांगभलं' आणि 'बोल मांढरच्या काळीचं चांगभलं' च्या गजराने सारा

परिसर दुमदुमुन जातो.
देवीचे मंदिर कधी व कोणी बांधले याची फारशी नोंद आढळून येत नाही. पण मंदिराच्या हेमाडपंथी शैलीतील बांधकामामुळे हे मंदिर बरेच प्राचीन असल्याचे सिद्ध होते. सह्याद्री पर्वतरांगेतील एका उंच समुद्र सपाटीपासून ४६५० फूट टेकडी वर हे मंदिर आहे. ते साताऱ्यातून २० कि.मी. अंतरावर आहे
मांढरदेवी काळुबाई चे मंदिर आहे. मंदिर लहान असुन त्यास सभामंडप व गाभारा आहे. गाभाऱ्यामध्ये चांदीचे सुरेख काम करण्यात आहे आहे. कळस रेखीव असुन त्यावर गाय, सिंह यांच्या मुर्ति बसविलेल्या आहेत. मंदीर पुर्वाभिमुख असुन मंदिरासमोर दिपमाळा आहेत. मुख्य मंदिराभोवती गोंजीबुवा, मांगीरबाबा, अशी देवी सेवक व राखणदार यांची मंदिरे आहेत. तसेच मुख्य मंदिरासमोरिल डोंगरात काही अंतरावर म्हसोबा देवाचं स्थान आहे. काळुबाई मंदिर परिसर निसर्गरम्य असुन वनराई ने नटलेला आहे.
मांढरदेवी येथे देवीचे स्वयंभू स्थान (मुर्ती) असुन मुर्ती चतुर्भुज आहे. देवीच्या उजव्या हातात त्रिशूल आणि तलवार आहे.तर डाव्या हातात ढाल आणि दैत्याची मान पकडलेली आहे. देवी उभी असुन एक पाय दैत्याच्या छातीवर ठेवलेला आहे. संपूर्ण मुर्तीस शेंदुर लावलेला आहे. देवीला बारामाही साडी नेसवलेली असते व इतरवेळी देवीच्या चेहऱ्यावर चांदीचा तर यात्रोत्सवात सोन्याचा मुखवटा बसविला जातो. देवीचे वाहन सिंह हे आहे.
सतयुगात मांढव्य ऋषि गडावर यज्ञ करित होते. (या ऋषिंमुळे गडाला मांढरगड नाव पडले) त्यांचा यज्ञकार्यात लाख्यासुर नावाचा दैत्य त्रास देत होता. तेव्हा दैत्याचा त्रास कमी व्हावा आणि यज्ञकार्य सिध्दिस जावे म्हणून मांढव्य ऋषिंनी महादेवांना प्रसन्न करून घेण्यासाठी तपश्चर्या करण्यास सुरुवात केली. तेव्हा महादेव प्रसन्न होवुन पार्वतीची प्रार्थना करण्यास सांगितले. पार्वतीची प्रार्थना करण्यास सुरवात केली. तेव्हा पार्वतीने प्रसन्न होवुन दैत्यवधासाठी अवतार घेईल असे सांगितले आणि दैत्यवधासाठी देवी कैलासातुन या मांढरगडावर आली. लाख्यासुराला महादेवाचा वर असल्याने दिवसा त्याचा वध करणे शक्य नव्हते तेव्हा देवीने लाख्यासुराचा रात्री वध करण्याचे ठरविले. पौष पोर्णिमेच्या रात्री देवीने दैत्याला युध्दासाठी आवाहन केले आणि तुंबळ युध्द करून मध्यरात्री लाख्यासुराचा वध केला व पुन्हा दैत्य निर्माण होऊ नये म्हणून लाख्यासुराचे सर्व रक्त प्राशन केले. युद्धकार्य उरकून देवी परत कैलासास निघाली आणि मांढरगड डोंगर चढुन वर आली आणि ऋषिंमुनी व भक्तजनांकरिता इथेच स्थानापन्न झाली. पांडव वनवासात जेव्हा या मांढरगडावर वास्तव्यास होते तेव्हा त्यांनी या मांढरदेवी काळुबाई चे पुजन केले होते. अशी एक दंतकथा सांगितली जाते. देवीने पौष पौर्णिमेच्या रात्री दैत्याचा वध केला आणि विजयी झाली. म्हणून आजही पौष पोर्णिमे ला देवीची मोठी यात्रा भरते. या काळात लाखो भाविक देवीचे देव्हारे घेउन गडावर येतात. ढोल, झांज ही देवीची प्रमुख वाद्य आहेत. भाविक गडावर चुली पेटवून देवीला पुरणपोळीचा नैवेद्य दाखवतात. तसेच सेवकांना मासांहारी नैवेद्य दाखवतात. पौष पोर्णिमेच्या मध्यरात्री देवीचा मुखवटा पालखीत बसवुन हजारो वाद्यांच्या गजरात देवीचा छबिना काढला जातो. देवीचा छबिना हा यात्रोत्सवाचे मुख्य आकर्षण आहे.



# अंबाजोगाईची श्री योगेश्वरी देवी

**महाराष्ट्रातील बीड जिल्ह्यातील बालाघाट डोंगराजवळ जयवंती नदी तीरावर अंबाजोगाई या गावात श्री योगेश्वरी देवीचे तीर्थक्षेत्र आहे. हे क्षेत्र देवीचे मुळस्थान म्हणून ओळखले जाते. देवीच्या शक्तीपिठापैकी हे मुळपीठ म्हणून प्रसिद्ध आहे. श्री योगेश्वरी देवी कोकणवासीयांची कुलस्वामिनी व अंबाजोगाई वासियांचे ग्राम दैवत म्हणूनहि प्रसिद्ध आहे. असे सांगितले जाते कि श्री योगेश्वरी देवी मंदिर हे अनादिकालापासून आहे व देवीचा अवतार स्वयंभू आहे. रुद्रयामाल या तांत्रिक ग्रंथातून देवीच्या सहस्त्रानामात 'अंबापूर संस्थाना पातु योगेश्वरी देवी' असा उल्लेखही आहे त्याचपुढे 'मुलादिवासिनी चंब अंबापूर निवासिनी' याचा अर्थ म्हणजे या मुलस्थानी ती अवतार घेऊन निवास करते. 'सर्वतीर्थ परादेवी तीर्थ दक्षिणतः स्थितः' त्याचप्रमाणे श्री योगेश्वरी देवीचे वास्तव्य अंबाजोगाई येथे सर्वतीर्थ नावाच्या तीर्थाच्या दक्षिण दिशेस असल्याचे त्यामध्ये उल्लेख आहे.**

**योगिनी हृदयदीपिका या ग्रंथत योगिनीचे वर्णनकेलेले ते असे की,**

**आदिशक्ती पार्वतीचे शक्ती अंशाने उत्पन्न झाल्यवर जगताला प्रकाशभूत होणाऱ्या आणि ब्रम्हा-विष्णू-महेश्वर आदि देवतामध्ये अंतर्भूत असलेल्या लहान मोठ्या सर्व पंचभौतिक परमाणुयुक्त चैतन्य शक्तीला योगिनी असे संबोधले जाते. अश्या या योगीनिमध्ये प्रमुख किंवा योगिनीच्यावर अधिपत्य करणारी देवता हि योगेश्वरी आहे. याप्रमाणे योगसाधनेला प्राधान्य देणारी देवी म्हणूनही योगेश्वरी नाव प्रचलित झालेले आहे**

**शैक्षणिक व अध्यात्मिक वारसा लाभलेल्या संताची भूमी म्हणून ओळखल्या जाणारे अंबाजोगाई गाव आहे. अंबेजोगाई हे शांत गाव असून शिक्षणासाठी अतिशय उत्तम म्हणून ओळखले जाते. उत्तम शिक्षणासह येथे थोर संत हि होऊन गेले. मुकुंदराज महाराज समाधी मंदिर मराठीचे आद्यकवी म्हणून ओळखले जातात. तसेच दासोपंत समाधी स्थान व दासोपंतांची पासोडी दर्शन अंबाजोगाईत आल्यानंतर होते.**



**संकलन / लेखांकन - विवेक वसंतराव सोनक**
**प्रांत प्रचार प्रमुख**
**विश्व हिंदू परिषद, पश्चिम महाराष्ट्र प्रांत**